रक्षाबंधन

वर्ष - 8 । अंक - 361 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शनिवार, दि. 9 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जागतिक समीकरणे बदलू लागली
## भारत, रशिया आणि चीन एकत्र येण्याच्या हालचालींना सुरुवात!

# मोदींच्या कूटनीतीने ट्रम्प यांची तंतरली !

### अमेरिकेला एकाकी पाडण्यासाठी प्रयत्न सुरू : ट्रम्प यांच्या टॅरिफ वरून संपूर्ण जगात नाराजी, सूडाची भावना

। नवी दिल्ली । / मॉस्को / बीजिंग । वृत्तसंस्था । महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मनमानी करून जगातील अनेक देशांवर विशेष टॅरिफ म्हणजेच वेगवेगळ्या प्रकारचे कर लादल्यामुळे संपूर्ण जगात त्यांच्याविषयी प्रचंड नाराजी असून सूड घेण्याची भावना जगात पुढे येत आहे. ट्रम्प यांची दादागिरी संपवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कूटनीती कामाला येण्याची शक्यता आहे. जागतिक पातळीवर नव्याने समीकरण तयार होत असून भारत, रशिया आणि चीन एकत्र येऊन ट्रम्प यांना त्यांची जागा दाखवण्याच्या विचारात असून गाठीभेटींना वेग आला आहे. या हालचाली पाहून ट्रम्प यांची मात्र पाचावर धारण बसली आहे.**



#### चक्रावून टाकणाऱ्या घोषणांचा धडाका

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पुन्हा एकदा डोनाल्ड ट्रम्प निवडून आल्यानंतर त्यांनी चक्रावून टाकणाऱ्या घोषणांचा धडाका लावला आहे. त्याचे परिणाम आता जगभरातील सर्वच देशांवर होत आहेत. यामुळे सर्वत्र अमेरिकेविषयी प्रचंड नाराजी असून सर्व जगामध्ये सूडाची भावना पेटली आहे.

#### नव्या समीकरणाची चर्चा..

सर्वत्र अशी परिस्थिती असताना भारत, रशिया आणि चीन एकत्र येत अमेरिकेच्या धोरणांना खीळ घालू शकतात, हे सर्वांच्या लक्षात आले असून त्या दृष्टीने पावले टाकली जात आहेत. या तिन्ही देशांदरम्यानच्या प्रतिनिधींच्या बैठकाही सुरू झाले आहेत.

#### मोडणार अमेरिकेचे टॅरिफ स्वप्न?

डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकट आणि आडमुठेपणामुळे जागतिक पातळीवर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'टॅरिफ' म्हणजेच विशेष कर लादला गेल्यामुळे इतर देशांच्या निर्यात आणि उत्पादन क्षमतेवर जबरदस्त परिणाम झाला आहे. अमेरिकेने भारतीय उत्पादनावर सुरुवातीला २५ टक्के टॅरिफ लावला. त्यानंतर त्यात वाढ करत आणखी २५ टक्के वाढवले. त्यामुळे भारतीय निर्यातदारांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारणामुळे अमेरिकेत भारताची शंभर रुपयांची वस्तू आता १५० रुपयांना विकली जाणार आहे. त्यामुळे भारतीय वस्तूंची मागणी आपोआप कमी होईल. त्याचा फटका निर्यातदारांना बसणार आहे.

#### अमेरिकेच्या पोटदुखीतून टॅरिफ..

अमेरिकेने भारतावर हा टॅरिफ पोटदुखीतून लावला आहे. भारत रशियाकडून तेल आणि शस्त्रे विकत घेतो, ही बाब अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना खटकली आहे. त्यामुळे त्यांनी भारतावर हा अतिरिक्त कर लादला आहे. दुसरीकडे, भारतानेही शेतकरी, दूध उत्पादक उद्योगांच्या हितासाठी तडजोड करणार नाही, हे स्पष्ट केले आहे. त्यामुळे भारताचा पवित्रा पाहता भारत, रशिया आणि चीन हे देश एका व्यासपीठावर येऊ शकतात. त्यामुळे जागतिक व्यवस्था आणि अमेरिकेवर थेट परिणाम होऊ शकतो. संपूर्ण जगाच्या हालचालींची समीकरणे त्यामुळे बदलणार आहेत.

#### आरआयसी म्हणजे काय?

जगात ज्या हालचाली सुरू आहेत, त्याचा इतिहास जाणून घ्यायला हवा. रशिया, भारत आणि चीन (आर.आय.सी) या त्रिपक्षीय देशांची एकजूट बांधण्याची सुरुवात १९९० च्या दशकात सुरु झाली होती. रशियाचे तत्कालीन पंतप्रधान येव्हगेनी प्रिमाकोव्ह यांनी यासाठी प्रयत्न केले होते. अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांना आव्हान देण्यासाठी त्यांनी हे पाऊल उचलले होते. या व्यासपीठाच्या माध्यमातून व्यावसायिक रणनिती, आर्थिक आणि सुरक्षासंदर्भात मोट घट्ट बांधण्याची तेव्हा तयारी देखील झाली होती. २००२ पासून २०२० पर्यंत या तीन देशात वीसहून अधिक मंत्रिस्तरीय बैठकाही झाल्या.

#### भारत-चीन सीमा वाद नडला..

या पार्श्वभूमीवर २०२० नंतर भारत-चीन सीमा वाद आणि कोरोनाच्या संकटामुळे तिन्ही देशातील चर्चा बंद झाली. पण, रशिया आणि चीन हे व्यासपीठ पुन्हा सक्रिय करण्याच्या तयारीत आहेत आणि भारतानेही याला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

#### तिघांकडे बदलाची ताकद

भारत, रशिया आणि चीन हे जगातील सर्वात मोठ्या देशांपैकी आहेत. या तीन देशांकडे जागतिक पातळीवर राजकीय समीकरणे बदलण्याची ताकद आहे. त्यामुळे हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेचे महत्त्व कमी होऊ शकते. तसेच आशियायी देशांची ताकद संपूर्ण जगाला कळून येईल. त्यात रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन हे भारत दौऱ्यावर येणार आहेत. या माध्यमातून भारताने अमेरिकेला काय तो स्पष्ट संदेश दिला आहे. यापूर्वी, ट्रम्प यांनी ब्रिक्स आणि भारत-रशिया भागीदारीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

#### म्हणून ट्रम्प यांचा जळफळाट..

जागतिक पटलावरील नव्या गणिताची अमेरिकेने धास्ती घेतली आहे. भारतावर पन्नास टक्के टॅरिफ लावण्यात आला आहे. या माध्यमातून ट्रम्प हे नेमके काय साध्य करू इच्छितात? याबाबत तज्ज्ञांना काय वाटते, हे जाणून घेऊ या. ट्रम्प यांच्या या निर्णयाचे पडसाद भारतात तर उमटलेच आहेत, मात्र, चीनने देखील त्यांच्या या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, ट्रम्प यांच्या या नव्या धोरणांचा जागतिक स्तरावर कसा प्रभाव पडणार ? त्याचा अमेरिकेवर कसा परिणाम होऊ शकतो? याबाबत संरक्षण विश्लेषक सतीश ढगे यांनी माहिती दिली आहे.

#### नेमकं काय म्हणाले ढगे?

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये कोणताही देश कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो, कायमचे असतात, ते त्या देशांचे हितसंबंध. एकेकाळी अमेरिका हा आपला जवळचा मित्र होता, पण, मागच्या काही काळात डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयामुळे खरोखरच अमेरिका भारताचा स्ट्रॅटेजिक पार्टनर बनण्यासाठी लायक आहे की नाही, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्याप्रमाणे ब्रिक्स ग्रुप आर्थिक दृष्ट्या उभारी घेतोय आणि त्यामुळे डॉलरचे महत्त्व कमी होईल, हे डोनाल्ड ट्रम्प ओळखून आहेत आणि त्यामुळेच भारतासारख्या देशावर आर्थिक प्रहार करण्याचा प्रयत्न डोनाल्ड ट्रम्प करत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

### भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची !

अमेरिकेला धडा शिकवण्यासाठी भारत, रशिया आणि चीन या देशांचे एकत्र येणे आता निश्चित झाले असले तरी भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्या दृष्टीनेच भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्याशी दोन दिवसापूर्वी दीर्घ चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील चीनचा दौरा निश्चित केला असून ते चीनला जातील आणि या मुद्द्यावर सविस्तर चर्चा करतील. ही सर्व मोदींची कूटनीती असून ट्रम्प यांच्या पायाखालची जमीन मात्र सरकली आहे. ट्रम्प यांच्याकडून भारताच्या विरोधात आणखी जास्त त्वेषाने निर्णय घेतले जाण्याची शक्यता मात्र आहे.

रक्षाबंधन

वर्ष - 8 । अंक - 361 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज TM

www.mahaenews.com । शनिवार, दि. 9 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**मोठी घोषणा** चाकण, हिंजवडी, मांजरी स्वतंत्र महानगरपालिका करणार

# पुण्यात आणखी 3 महापालिका हव्यात!

## चाकण येथील वाहतूक कोंडीची पाहणी करताना उपमुख्यमंत्री पवारांची घोषणा

। चाकण ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुणे जिल्ह्यात नव्याने तीन महापालिका कराव्या लागतील. मांजरी-फुरसुंगी-उरळी देवाची, चाकण आणि हिंजवडी अशा तीन महापालिका कराव्या लागणार आहेत, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. चाकण (ता.खेड) येथील वाहतूक कोंडीची पाहणी करताना त्यांनी ही मोठी घोषणा केली.**



पुणे- नाशिक महामार्ग, चाकण-तळेगाव, चाकण- शिक्रापूर महामार्ग तसेच औद्योगिक वसाहतीतील रस्ते व वाहतूक कोंडीची शुक्रवारी (दि.८) सकाळी सहा वाजल्या पासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहणी केली. यावेळी पोलिस आयुक्त, पीएमआरडीएचे आयुक्त आणि महामार्ग तसेच विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी खेडचे आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते आदींसह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

अजित पवार यांनी पहाटेच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या चाकण मधील तळेगाव चौकात पाहणी केली.याच चौकातून चाकण एमआयडीसीमध्ये कर्मचाऱ्यांना जावे लागते.यावेळी त्यांनी चाकणला स्वतंत्र महानगरपालिका होणार असल्याचे सूतोवाच केले. पवार म्हणाले की, कुणाला आवडो किंवा न आवडो पण नजीकच्या काळात चाकण आणि या सर्व परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार आहे आणि महानगरपालिका केल्याशिवाय आपल्याला अधिकचा निधी मिळणार नाही.

### पोलिस अधिकाऱ्यांना खडसावले

अजित पवार पाहणी करण्यासाठी तळेगाव चौक येथे थांबलेले असताना पोलिसांनी पुण्याहून नाशिक कडे जाणारी वाहतूक रोखून धरल्याने तळेगाव चौक ते आळंदी फाटा भागात प्रचंड वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे अजित पवार यांनी संताप व्यक्त केला.पवार म्हणाले की. मी सकाळी 6 वाजता दौरा करतोय, एक गाडी थांबली की गाड्यांच्या रांगा लागतायेत. मग 'पिक टाईम'मध्ये काय अवस्था होत असेल, वाहने रोखून धरल्याने उपमुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना खडसावले. हे बरोबर नाही. ही वाहने थांबवून कोंडी का केलीय?, सगळी वाहतूक सुरु करा, असं अजित पवार म्हणाले. चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतुककोंडीचा आढावा घेताना अजित पवारांनी अधिकाऱ्यांना अनेक सूचना केल्या.

चाकण एमआयडीसीमध्ये १५०० हून अधिक छोट्या-मोठ्या कंपन्या आहेत, त्यात साडे तीन लाख कर्मचारी काम करतात. त्यामुळे या परिसरात रोज लाखभर वाहने ये-जा करतात. रस्त्याची कामे होत नाहीत , त्यामुळे या चौकातील कोंडी फोडण्याचं मोठं आव्हान सरकारसमोर निर्माण झालेले आहे. वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले असून ही समस्या सोडवण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार मागील काही दिवसांपासून पिंपरी-चिंचवड, आयटी पार्क, चाकणमधील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ॲक्शन मोडवर आले आहेत.

> ‘तुम्हाला आवडो किंवा न आवडो पण नजीकच्या काळात चाकण आणि या सर्व परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार आहे, आणि महानगरपालिका केल्याशिवाय आपल्याला अधिकचा निधी आणि बाकीच्या ज्या काही गोष्टी आहेत . जसं की रस्ता अंडरग्राउंड ड्रेनेज, अशा अनेक गोष्टी असतात. यामध्ये बँकांचे वर्ल्ड बँकेचे पैसे आणता येतात, केंद्र सरकारचा निधी आणता येतो, या प्रकारे आपल्याला करावे लागेल. काहींना आवडेल न आवडेल. मात्र, काळानुसार निर्णय घ्यावे लागतात. मी देखील काम करताना पाहिलं आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये नव्या महापालिका आल्या, ठाणे महानगरपालिका एकटी होती. त्यानंतर मुंबई महानगरपालिका झाली’,
>
> **-अजित पवार,** उपमुख्यमंत्री, तथा पालकमंत्री पुणे

### अजित पवार नेमकं काय म्हणाले?

अजित पवार यांनी आज पहाटे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या चाकण चौक आणि परिसराची पाहणी केली. यावेळी ते म्हणाले की, ‘पुणे-नाशिक आणि चाकण-शिक्रापूर मार्गावरील या चौकात वाहतूक कोंडी नित्याची असती. याच चौकातून चाकण एमआयडीसीमध्ये कर्मचाऱ्यांना जावं लागतं. या एमआयडीसीमध्ये १५०० छोट्या-मोठ्या कंपन्या आहेत. त्यात साडेतीन लाख कर्मचारी काम करतात. त्यामुळे या परिसरात लाखोंच्या संख्येत वाहनांची ये-जा असते. या चौकातील कोंडी फोडण्याचं मोठं आव्हान सरकारसमोर असणार आहे. त्यामुळे चाकण आणि परिसरात महानगरपालिका करावी लागणार आहे. काहींना आवडेल न आवडेल, पण हे करावं लागेल’, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

## तूर्तास तिसऱ्या महापालिकेची गरज नाही; देवेंद्र फडणवीस

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात तूर्तास तिसऱ्या महापालिकेची गरज नाही. भविष्यात गरज पडल्यास तिची निर्मिती करू, असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्याला आणखी तीन महापालिकांची गरज असल्याचे मत व्यक्त केले होते. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी बोलताना तिसऱ्या महापालिकेची तूर्तास गरज नसल्याचे सांगितले. पुणे महानगर क्षेत्राचे स्वतंत्र नियोजन पीएमआरडीएद्वारे करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. तीन महापालिका म्हणजे दोन ऑलरेडी आहेत, अजून एक, अशा तीन करा, असे अजितदादांचे म्हणणे आहे. अजून तीन नाही. पुणे आणि पिंपरी-चिंचवड, अशा दोन मनपा आहेत, अजून एक महापालिका करा, अशी चर्चा बऱ्याच दिवसांपासून आहे. आतातरी पीएमआरडीए केल्यामुळे कदाचित त्याची लगेच निकड आहे का? याचा विचार आपल्याला करावा लागेल. पण, भविष्यात ज्याप्रकारचे शहरीकरण पुण्यात होते आहे, त्यावरून भविष्यातकधीतरी आपल्याला हा विचार करावाच लागेल, असे मत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडले. पुणे महापालिकेमध्ये 32 गावांचा समावेश करण्यात आल्याने महापालिकेचे क्षेत्र 510 चौ. कि.मी.पेक्षा अधिक झाले आणि पुणे महापालिका आकाराने मुंबईपेक्षा मोठी झाली. त्यामुळे एकाच महापालिकेला एवढ्या मोठ्या क्षेत्राचा कारभार सांभाळणे अवघड असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही यापूर्वी या मागणीचा विचार करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे पुणे महापालिकेचे विभाजन होण्याची शक्यता बळावली होती. तथापि, मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज तिसरी महापालिका तूर्तास होणार नसल्याचे निःसंदिग्धपणे सांगितले आहे. त्यामुळे याबाबतच्या चर्चेला आता पूर्णविराम मिळाल्याचे मानले जाते.

**अजित पवार चिडले** नदी सुशोभीकरणासाठी अडथळा ठरणारी झाडे तोडण्यात येणार

# कुठून या पुण्याचा पालकमंत्री झालो!

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज
पिंपरी-चिंचवड

**शहरातून वाहणाऱ्या मुळा नदी सुशोभीकरणासाठी अडथळा ठरणारी एक हजार झाडे तोडण्यात येणार असून, पालकमंत्री म्हणून ती रोखावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली असता उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार चिडले. 'कोणीही उठतो, उपदेश करतो. सर्व मक्ता मीच घेतला आहे. हे सगळे ऐकल्यावर कुठून या पुण्याचा पालकमंत्री झालो असे वाटते,' अशी भावना पवार यांनी व्यक्त केली.**

## शंभर कोटी रोपांची लागवड



## एक हजार झाडे तोडण्यात येणार

पुढील चार वर्षे २५ कोटी, अशी पाच वर्षांत शंभर कोटी रोपांची लागवड केली जाणार आहे,शासकीय कार्यक्रमात आता पुष्पगुच्छाऐवजी रोपे भेट दिली जात आहेत. त्याचे रोपण करून हे वृक्ष जगविले पाहिजेत. वृक्षरोपणासाठी आवश्यक ती मदत केली जाईलपिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या मुळा नदी सुशोभीकरणासाठी अडथळा ठरणारी एक हजार झाडे तोडण्यात येणार

चिंचवड येथे अभिनेते सयाजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, वनांसाठी काम करणारे आसाम येथील जाधव पायांग या वेळी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे भाषण संपत असताना सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी पवार यांना वृक्षतोड थांबविण्याबाबत विनंती केली. ते म्हणाले, 'पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी सुशोभीकरणासाठी हजारो झाडे तोडली जाणार आहेत. दुर्गादेवी टेकडीवरील झाडेही तोडली जाणार आहेत. एमआयडीसी क्षेत्रासह शहरात प्रचंड वृक्षतोड सुरू आहे. आपण पालकमंत्री आहात. पालकमंत्री म्हणून शहरात होणारी वृक्षतोड थांबवावी.' त्यावर, 'हे सगळे ऐकल्यानंतर कुठून या पुण्याचा पालकमंत्री झालो, असे मला वाटायला लागले आहे. जो तो उठतो आणि मला उपदेश करतो. सगळा मक्ता मीच घेतलेला आहे. यांनी केवळ उपदेश करायचा आहे,' असे म्हणून पवार यांनी प्रस्तावित वृक्षतोडीवर बोलणे टाळले.'मराठवाडा, विदर्भात झाडांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे राज्य शासनाने वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेतली आहे. यंदा राज्यात दहा कोटी झाडे लावली जाणार आहेत. त्यापैकी एक कोटी झाडे बीड जिल्ह्यात लावली जाणार आहेत. पुढील चार वर्षे २५ कोटी, अशी पाच वर्षांत शंभर कोटी रोपांची लागवड केली जाणार आहे,' असे पवार यांनी सांगितले.'शासकीय कार्यक्रमात आता पुष्पगुच्छाऐवजी रोपे भेट दिली जात आहेत. त्याचे रोपण करून हे वृक्ष जगविले पाहिजेत. वृक्षरोपणासाठी आवश्यक ती मदत केली जाईल,' असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.चिंचवड येथे अभिनेते सयाजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, वनांसाठी काम करणारे आसाम येथील जाधव पायांग या वेळी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे भाषण संपत असताना सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी पवार यांना वृक्षतोड थांबविण्याबाबत विनंती केली. ते म्हणाले, 'पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी सुशोभीकरणासाठी हजारो झाडे तोडली जाणार आहेत. दुर्गादेवी टेकडीवरील झाडेही तोडली जाणार आहेत. एमआयडीसी क्षेत्रासह शहरात प्रचंड वृक्षतोड सुरू आहे. आपण पालकमंत्री आहात. पालकमंत्री म्हणून शहरात होणारी वृक्षतोड थांबवावी.' त्यावर, 'हे सगळे ऐकल्यानंतर कुठून या पुण्याचा पालकमंत्री झालो, असे मला वाटायला लागले आहे. जो तो उठतो आणि मला उपदेश करतो. सगळा मक्ता मीच घेतलेला आहे. यांनी केवळ उपदेश करायचा आहे,' असे म्हणून पवार यांनी प्रस्तावित वृक्षतोडीवर बोलणे टाळले.'मराठवाडा, विदर्भात झाडांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे राज्य शासनाने वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेतली आहे. यंदा राज्यात दहा कोटी झाडे लावली जाणार आहेत. त्यापैकी एक कोटी झाडे बीड जिल्ह्यात लावली जाणार आहेत.

# मेट्रो मार्गिकांचे जाळे अन् मेट्रो लाईट मार्गिका!

## महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने 'सर्वंकष गतिशीलता योजना'

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहर आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने कार्यान्वित असलेल्या आणि बांधकाम सुरू असेलल्या मेट्रो मार्गिकांच्या जाळ्यांव्यतिरिक्त नव्याने ३१२ किलोमीटर लांबीची मेट्रो मार्गिका आणि मेट्रो-लाईट मार्गिका, त्यामध्ये ८०.५ किलोमीटर नवीन बस रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टिम (बीआरटीएस) मार्ग आणि ४६.३ किलोमीटर हाय फ्रिक्वेन्सी बस मार्ग करण्यात येणार आहेत.**




## आराखड्यातील प्रमुख शिफारशी

येत्या काळात चार हजार आणि २०५४ पर्यंत ११ हजार ५६४ बस घेण्याचे आराखड्यात नियोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर ६४१ किलोमीटर लांबीचे नवीन बस मार्ग तयार करण्याचेही प्रस्तावित आहे. आराखड्यात पीएमपीच्या सध्याच्या बारा टर्मिनलचा पुनर्विकास आणि ११ नवीन टर्मिनलची निर्मिती, सध्याच्या पाच आगारांचा पुनर्विकास आणि १५ नवीन आगार तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

पुणे महानगर प्रदेशासाठी (पीएमआर) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने 'सर्वंकष गतिशीलता योजना' (कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन) तयार केली आहे. त्यामध्ये या शिफारशी करण्यात आल्या आहेत. यामुळे शहर आणि परिसरातील वाहतुकीचा वेग वाढेल, असा दावाही करण्यात आला आहे.

या योजनेचे सादरीकरण 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सादरीकरण केले. हा आराखडा पुढील तीस वर्षांसाठीचा असून शाश्वत गतिशीलता, सुलभ वाहतूक पर्याय, मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब, कमी पर्यावरणीय समस्या आणि कमी खर्चात सार्वजनिक वाहतुकीचा प्रवास या बाबींना प्राधान्य देण्यात आले आहे.सर्वंकष गतिशीलता योजनेच्या प्रमुख शिफारशींमध्ये सध्याच्या मेट्रो मार्गिकांच्या जाळ्या व्यतिरिक्त ३१२ किलोमीटर मेट्रो आणि मेट्रो लाईट मार्गिकांची कामे करण्यात येणार आहेत.

त्यामध्ये ८०.५ किलोमीटर नवीन बस रॅपिड ट्रान्सपोर्ट सिस्टिम (बीआरटीएस) मार्ग आणि ४६.३ किलोमीटर हाय फ्रिक्वेन्सी बस मार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत.

**वाहतूक कोंडीची समस्या** सर्वंकष गतिशीलता योजनेअंतर्गत वाहतूक कोंडीमुक्तीसाठी

# एक लाख 30 हजार कोटींची योजना!

## पहिल्या टप्प्यात ६२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार, मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड सर्वंकष गतिशीलता योजनेअंतर्गत पुढील तीस वर्षांचा विचार करून वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने दीर्घकालीन उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत. त्यानुसार एक लाख ३० हजार कोटी रुपयांची योजना हाती घेण्यात आली असून पहिल्या टप्प्यात ६२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिली.**



यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) येथे महामेट्रोच्यावतीने आयोजित ‘पुणे शहर सर्वंकष गतिशीलता’ योजनेसंदर्भात शुक्रवारी बैठक झाली. त्यावेळी फडणवीस बोलत होते. उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ‘मित्रा’ संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी,मुख्य सचिव राजेश कुमार,अपर मुख्य सचिव (गृह) इक्बालसिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, प्रधान सचिव अश्विनी भिडे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यावेळी उपस्थित होते.

‘गतिशीलता योजना १ लाख ३० हजार कोटी रुपयांची असून पहिल्या टप्प्यात ६२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या नियोजनानुसार पहिल्या टप्प्यात सार्वजनिक वाहतूक ३० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असून त्यानंतर ते पन्नास टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येईल. प्रत्येक व्यक्तीला पाचशे मीटरच्या अंतरामध्ये सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून दिली जाईल. त्यादृष्टीने नियोजन करण्याची सूचना अधिकाऱ्यांना केली असून सर्व विभागांकडील जबाबादरी निश्चित करण्यात येणार आहेत. महानगरांमध्ये सरासरी वेगमर्यादा तीस किलोमीटर पर्यंत होईल, या दृष्टीनेही प्रयत्न करण्यात येतील,’ असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

कर्जमाफीसाठी शेतकरी करणार राज्यव्यापी आंदोलन; राजू शेट्टी, बच्चू कडू, शिवसेना ठाकरे गट, शेतकरी संघटनांचा सरकारवर हल्लाबोल

‘पुणे विभागाची ही योजना तीस वर्षात पूर्ण होणार आहे. बोगदे, समतल विलगक (ग्रेड सेपरेटर) या अंतर्गत केले जाणार असून गतिमान वाहतुकीशी ते संलग्न केले जातील. सार्वजनिक वाहतुकीअंतर्गत पुढील दोन वर्षात सहा हजार गाड्या घेण्याचे नियोजित आहे,’ असेही फडणवीस यांनी सांगितले.

### हडपसर ते उरुळी कांचनपर्यंत मेट्रो मार्गिका

शहरात मेट्रोचे जाळे शहरात निर्माण करुन वाहतूक कोंडी सोडवण्याचे राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. पुणे शहर सर्वंकष गतिशीलता योजना आराखड्यात हडपसर ते लोणी काळभोर मेट्रो मार्गिका प्रास्तवित आहे. शहराची वाढती लोकसंख्या, पुणे-सोलापूर महामार्गावरील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता लोणी काळभोर ऐवजी हडपसर ते उरुळी कांचन मेट्रो मार्गिका असा बदल करण्याबाबत विचार करावा. पुणे व पिंपरी चिंचवड शहराचे वाढते नागरीकरण आणि त्यानुसार लागणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत नियोजन करावे, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

### विसर्जन मिरवणुकीबाबत बैठकीत तोडगा

पुणे म्हटल्यानंतर चर्चा, वाद, विवाद होतातच. पण काळजी करू नका, खासदार मुरलीधर मोहोळ आणि हेमंत रासने हे बैठक घेणार आहेत. सर्व मिळून एक निर्णय घेतील. सरकार विनाकारण हस्तक्षेप करणार नाही. मार्ग नाही निघाला नाही तरच लक्ष घालू, असे विसर्जन मिरवणुकीतील वादाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# राखीच्या धाग्याने विणला ‘सुरक्षेचा विश्वास’!

## विद्यार्थिनींकडून अग्निशमन विभागासाठी अनोखा रक्षाबंधन सोहळा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रक्षाबंधनाचा सण म्हणजे बहीण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक. यंदाचा रक्षाबंधन दिवस पिंपरी चिंचवडमधील अग्निशमन विभागासाठी खास ठरला आहे. यावर्षी अग्निशमन विभागाच्या पिंपरी येथील मुख्य अग्निशमन केंद्रातील जवानांना, चिखली येथील इनोव्हेशन वर्ल्ड स्कूल या शाळेच्या इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनींनी राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले.**




अग्निशमन केंद्राच्या मुख्यालयात आयोजित या विशेष उपक्रमात शाळेच्या ४ ते ८ वयोगटातील सुमारे २० चिमुकल्यांनी सहभाग घेतला. यावेळी “ये रक्षाबंधन सबसे बडा त्योहार है” हे गाणं म्हणत, जवानांना राखी बांधून रक्षाबंधन सणानिमित्त शुभेच्छा दिल्या. या छोट्याशा हृदयस्पर्शी उपक्रमामुळे उपस्थित सर्वजण भारावून गेले.

मुलांमध्ये समाजासाठी कार्य करणाऱ्यांविषयी आदराची भावना हानपणापासून रुजावी, या उद्देशाने या उपक्रमाची कल्पना साकारली गेली. पालक आणि विद्यार्थ्यांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सण साजरा करणं हा या उपक्रमाचा मुख्य हेतू नव्हताच, तर समाजात खऱ्या अर्थाने रक्षण करणाऱ्या जवानांना सलाम करणे, त्यांच्या कार्याची ओळख मुलांना करून देणे आणि त्यांच्याशी भावनिक नातं निर्माण करणे हा मुख्य हेतू होता, असे शाळेच्या शिक्षिकांनी सांगितले. यावेळी मुलांनी उपस्थित अग्निशामक जवानांना “तुम्ही आग कशी विझवता?”, “घाबरत नाही का?”, “तुमचं कुटुंब कुठे आहे?” यांसारखे प्रश्न विचारले.

> राखी ही फक्त भावनिक नात्याची खूण नाही, तर समाजातील रक्षकांप्रती असलेली कृतज्ञता आणि जिव्हाळ्याचं प्रतीक आहे. जेव्हा ती आपल्या अग्निशमन जवानांच्या हातावर बांधली जाते, तेव्हा ती सामाजिक जबाबदारीचा धागा ठरतो. लहान मुलांनी आपत्कालीन सेवा देणाऱ्या जवानांना बांधलेली राखी ही सामाजिक बांधिलकीची साक्ष आहे. हा क्षण संपूर्ण विभागासाठी अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी ठरला आहे.
>
> **- उमेश ढाकणे,** सहाय्यक आयुक्त, अग्निशमन विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

> या चिमुकल्यांनी आमच्या केंद्रात येऊन रक्षाबंधन साजरे केले. रोज मृत्यूच्या सावलीत काम करणाऱ्या आमच्या जवानांसाठी ही राखी म्हणजे प्रेरणेचा, प्रेमाचा आणि जबाबदारीचा नवा धागा आहे. असे उपक्रम केवळ जवानांचे मनोबल वाढवत नाहीत, तर समाजात आपत्कालीन सेवांबाबत जागरूकता आणि आदरही निर्माण करतात.
>
> **-संतोष सरोटे,** वरिष्ठ अग्निशामक जवान, पिंपरी चिंचवड महापालिका

# राहुल गांधींकडून आरोपांच्या फैरी ! निवडणुकीत म्हणे, मतांची चोरी !!






‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**गेले काही दिवस काँग्रेस नेते राहुल गांधी हे निवडणूक आयोगावर बेछूट आरोप करत सुटले आहेत. आरोप अंगलट आले की माफिनामा देण्यातही त्यांना कमीपणा वाटत नाही. जनतेमध्ये असलेला काँग्रेसचा मूलभूत पाया ढासळला आहे, हे त्यांना मान्य नाही, किंवा केंद्र सरकारच्या कामाला जनता पोचपावती देत आहे, हे मान्य करण्याचीही त्यांची दानत नाही !**

### बळकट लोकशाही निवडणूक आयोगामुळे..

जगामध्ये भारताच्या लोकशाहीचे कौतुक होत असते, निवडणुकीत यंत्रणेची पारदर्शकता, स्वच्छ कारभार कसा आहे हे पाहण्यासाठी जगातून लोक येतात आणि निवडणूक आयोगाला समजावून घेतात. थोडक्यात काय, भारतीय लोकशाहीची बिनचूक धुरा म्हणजे निवडणूक आयोग ! या संस्थेवर जनतेचा विश्वास टिकून आहे, कारण आपल्या येथील मतदान पारदर्शक, मुक्त आणि नि:ष्पक्षपणे पार पडते. मात्र, राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेऊन ‘हात दाखवून अवलक्षण’ केले आहे ! राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर आणि मतदान प्रक्रियेवर अनेक गंभीर आरोप केले आहेत. महाराष्ट्रातील ४० लाख संशयास्पद मतदार, कर्नाटकमधील मतांची चोरी, आणि निवडणुकांचे ‘पूर्वनियोजन’ केल्याचा दावा.. हे सर्व आरोप जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करणारे होते, हे मान्य त्यांचा खुलासा निवडणूक आयोग करेल. पण, त्यात तथ्य आहे का ?

### राहुल यांचे आरोप गंभीर..पण?

राहुल यांचा पहिला मोठा आरोप म्हणजे महाराष्ट्रात ४० लाख ‘संशयित’ मतदार नावांची भर ! दुसरा आरोप कर्नाटकातील महादेवपुरा मतदारसंघात एक लाख मतांची चोरी, तिसरा आरोप, ईव्हीएम मशीन आणि मतदान यादीतील ‘हेरफेर’, त्यानंतर चौथा आरोप म्हणजे निवडणुका पूर्वनियोजित होणे म्हणजेच घडवून आणलेला निकाल !

### महाराष्ट्रात मतदारांची वाढ..

राहुल गांधी म्हणतात, की महाराष्ट्रात अवघ्या पाच महिन्यांत ४० लाख नव्या मतदारांची नोंद झाली आणि ती ‘संशयास्पद’आहे. आता, याबाबत आयोगाचा अधिकृत अहवाल पाहू या. २०२४-२५ मध्ये महाराष्ट्रात १८ वर्षे पूर्ण झालेल्या नव्या नागरिकांची संख्या सुमारे ३०-३५ लाख होती. प्रत्येक वर्षी ‘मतदार यादी विशेष सुधारणा मोहीम’ राबवली जाते, त्यात नवीन नोंदणी, मृत व्यक्तींची नावे वगळणे, स्थलांतरितांची नावे नोंदविणे, अशी पावले उचलली जातात. या प्रक्रियेसाठी आयोग खास प्रणाली वापरतो. ही प्रणाली सर्वदूर पारदर्शक आणि डेटा सुरक्षित ठेवते. ४० लाख आकड्यात घोटाळा नाही, तर तो जनगणनेनुसार नियमित भरतीचा भाग आहे. आयोगाने याबाबत सर्व डाटा वेबसाइटवर अपलोड केला असून ‘डुप्लिकेट’ किंवा ‘खोट्या’ मतदारांची यादी तपासणीसाठी खुली असते.

### मतांच्या चोरीत तथ्य आहे का ?

राहुल यांनी आरोप केला, की कर्नाटकातील महादेवपुरा मतदारसंघात सुमारे एक लाख मते चोरली गेली. परंतु, हा आरोप २०२३ मध्येही काँग्रेसने केला होता, त्यावर निवडणूक आयोगाने तात्काळ चौकशी केली.आयोगाने मतदारांची नावे वगळण्यापूर्वी संबंधित व्यक्तींना नोटीस दिली होती आणि त्यांच्या हरकती मागवल्या होत्या. आजही निवडणूक आयोग काँग्रेसकडून शपथपत्र आणि वास्तव आधारित पुरावे मागत आहे. आयोगाकडे पुरावे न देता सार्वजनिक व्यासपीठावर आरोप करणे ही लोकशाही प्रक्रियेचा गैरवापर आहे. या मध्ये मतदारांचे नाव वगळणे, चुकीचा पत्ता इत्यादी यासारख्या बाबींसाठी मतदार स्वतः फॉर्म भरून दुरुस्त करू शकतो, पण राहुल गांधी यांना केवळ प्रसिद्धीची हाव आहे.

### मतांची चोरी, चोरीचे पाच मार्ग..

राहुल यांनी म्हटले आहे, की मतांची चोरी खालील पद्धतीने झाली किंवा करता येते. बनावट मतदार तयार करणे, डुप्लिकेट नावांची नोंद, चुकीच्या पत्त्यांवर आधार घेणे, निवडणूक आयोगाकडून डेटा मिळण्यास अडथळे तसेच सीसीटीव्ही फुटेज नष्ट करणे. एक गोष्ट लक्षात घ्या, यातील अनेक मुद्द्यांवर आयोगाने स्पष्टीकरण दिले आहे, ते पाहण्याची इच्छा राहुल गांधी यांची नाही. सीसीटीव्ही फुटेज एक वर्षासाठी सुरक्षित ठेवले जाते आणि निवडणुकीनंतरच ते मिटवले जाते. डुप्लिकेट नोंदी टाळण्यासाठी आयोग आधार लिंकिंग आणि ए आय बेस्ड डुप्लिकेट डिटेक्शन वापरतो. मतदार याद्या आयोगाच्या वेबसाईटवर सार्वजनिकपणे उपलब्ध असतात. मतांची चोरी झालेले कोणतेही स्पष्ट, सर्वमान्य आणि तपासले गेलेले पुरावे काँग्रेसकडे अद्याप नाहीत. त्यामुळे राहुल गांधी यांचा फक्त हवेत गोळीबार सुरू आहे, हे स्पष्ट होते.

### निवडणुका ‘कोरिओग्राफ’ झाल्या का ?

‘कोरिओग्राफ’ म्हणजे एखादी गोष्ट ठरवून नियोजित पद्धतीने करणे. राहुल गांधी यांचा हा आरोप अत्यंत गंभीर आहे. पण, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला काही राज्यांमध्ये मोठ्या जागा गमवाव्या लागल्या. जर आयोग पक्षपाती असता, तर हे घडले नसते, हे त्यांच्या लक्षात यायला हवे ! काँग्रेसने पंजाब, तेलंगणा, केरळ, कर्नाटकमध्ये चांगला परफॉर्मन्स केला ही निवडणूक आयोगाची नि:ष्पक्षताच दर्शवते. पराभवाचे खापर आयोगावर फोडणे म्हणजे राजकीय अपरिपक्वतेचा नमुना आहे, हे कोणीतरी राहुल गांधी यांना समजावून सांगायला हवे, नाहीतर त्यांची बालबुद्धी भरकटतच राहील !

### पराभव स्वीकारा, आरोप कसले करता?

निवडणूक आयोगावर असे पुराव्याविना बिनबुडाचे आरोप करणे म्हणजे संस्थात्मक स्थैर्याला मारक आहे. राजकीय पक्ष पराभव स्वीकारण्याऐवजी आरोप-प्रत्यारोपात गुंतले, तर जनतेचा निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास ढळू शकतो, हे राहुल गांधी यांना कोण सांगणार ? ते समजून घेण्याची त्यांची क्षमता आहे का ?

### कसलेही तथ्य नाही, हवेत गोळीबार..

राहुल यांनी सादर केलेले आरोप हे तथ्यांविना, निष्कर्षांऐवजी आरोपांच्या आधारावर मांडले गेले आहेत. कोणतीही शंका असल्यास तिची चौकशी व्हायला हवीच. पण, त्यासाठी निवडणूक आयोगासोबत सहकार्य करणे हाच लोकशाही मार्ग आहे. प्रेस कॉन्फरन्समध्ये केलेले भाषण आणि सत्य यामधला फरक पाहून जनता हसत आहे.

### देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया..

या सगळ्या हास्यास्पद प्रकारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलकी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या मते राहुल गांधी यांना त्यांचा मेंदू तपासायला सांगितला पाहिजे. कदाचित, त्यांच्या मेंदूतील ‘चीप’ गायब झाली आहे, म्हणून ते असे बेताल वक्तव्य करत आहेत, असा टोला फडणवीस यांनी लगावला आहे.

### दिशाहीन काँग्रेस, बेताल नेता..

निवडणूक आयोगावर आरोप करण्यापेक्षा, जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी काँग्रेसने आपले संघटन, विचारसरणी मजबूत करावी. नुसते आरोप करून जनता मतदान करत नसते, त्यासाठी भव्य दिव्य काम करावे लागते आणि देशाची प्रतिमा उंचावत ठेवावी लागते.. त्यामुळेच मतदारांचे मन ‘हॅक’ करता येते, हे राहुल गांधी यांना कोणीतरी सांगा हो !

---

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



‘स्टेट’मेंन्ट

राहुल जगताप

### समाधान ही आंतरिक सुधारणेची खूण आहे.

प्रपंचात काय किंवा परमार्थात काय, काही पथ्ये पाळायला लागतातच. नेहमी ‘ राम कर्ता ’ ही भावना मनात जागृत ठेवा. शोक, चिंता, भीती, आशा, तृष्णा ह्या सर्व ‘ राम कर्ता ’ म्हटल्याने नाहीशा होतात. ज्या अर्थी त्या अजून नाहीशा होत नाहीत, त्या अर्थी रोग कायमच आहे असे म्हटले पाहिजे. तरी आजपासून, ह्या घटकेपासून, नामात रहाण्याचा निश्चय करा, आणि ‘ राम कर्ता ’ ही भावना दृढ करा. कुणी आपल्याला बरे म्हटले की तेवढ्यापुरते बरे वाटते; ते समाधान म्हणता येईल का ? जे मिळाल्याने दुसरे काही हवेसे वाटणार नाही, ते समाधान. समाधान ही आंतरिक सुधारणेची खूणच आहे. ते मिळविण्यासाठी प्रपंच सोडण्याची जरुरी नाही. प्रपंच सोडून कितीही लांब गेले तरी त्याची आठवण येतेच. तेव्हा, तसा तो सोडता येत नाही; तो एक ‘ राम ’ म्हटल्यानेच सुटू शकेल. कोणतेही कर्म करताना भगवंताच्या नामात करा. त्यामुळे समाधान मिळून, मनुष्य सुखदु:खाच्या द्वंदात गुरफटला जाणार नाही. जो कोणी स्वत:चा उद्धार करून घेईल तो खरा ज्ञानी; काही न करणारा हा खरा अडाणी होय.

वासनेचे परिणत स्वरूप म्हणजे बुद्धी होय. जी बुद्धी बंधनामध्ये काम करते ती खरी स्वतंत्र बुद्धी होय. बंधनाला न जुमानता मनाप्रमाणे वागणारी, ती स्वैराचारी बुद्धी होय. वासना नष्ट होणे म्हणजे देहबुद्धी नष्ट होणे होय. प्रापंचिक मनुष्याला विषय टाकता येतील हे शक्य नाही. त्याचे विषयाचे प्रेम रक्तात इतके भिनले आहे की ते काढून टाकायला सूक्ष्म अस्त्र पाहिजे. नाम हे अतिशय सूक्ष्म अस्त्र आहे. ते घेतल्याने विषयाचे प्रेम नष्ट होईल. खरोखर, थोडा मनापासून निश्चय करा. तो परमात्मा फार दयाळू आहे, तो खात्रीने आपल्या निश्चयाच्या पाठीशी राहील. दोष न पाहाताही जो दुसऱ्याला जवळ करतो तो दयाळू खरा. भगवंत अत्यंत दयाळू आहे. त्याच्या नामाच्या सहवासात राहिल्याने देहावरचे प्रेम नष्ट होईल, आणि देहावरचे प्रेम नष्ट झाले की संसारावरचेही प्रेम कमी होईल, आणि आपल्याला सर्वत्र राम दिसू लागेल. प्रत्येक जीवाची ओढ चिरंतन समाधानाकडेच असते. ती ओढ परमेश्वरप्राप्तीनेच पुरी होऊ शकते. ही प्राप्ती व्हायला अत्यंत सुलभ साधन जर कोणते असेल, आणि त्याचा सतत सहवास जर कशाने लाभत असेल, तर एका नामानेच. ज्याने नाम हृदयात अखंड बाळगले, त्याला सर्वत्र परमेश्वरच दिसेल. इतर साधनांमध्ये उपाधीमुळे थोडी तरी चलबिचल आहे, नाम हे स्थिर आहे. हे भगवंताचे नाम आवडीने घ्या, श्रद्धेने घ्या, मनापासून घ्या.

बोधवचन:- अखंड नामस्मरणात राहा, किती समाधान राहील !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक ः MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक ः वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक ः सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**आरक्षण ठरले** ६८ सदस्य, प्रभागाची लोकसंख्या सरासरी २० हजार

# नगरमध्ये प्रभाग रचनेचा मसुदा सादर!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा मनपा प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला. या आराखड्यानुसार प्रत्येकी ४ सदस्यांचे १७ प्रभाग तयार करण्यात आले आहेत. सदस्य संख्या ६८ असणार आहे. एक प्रभाग सरासरी २० हजार लोकसंख्येचा (कमी-अधिक १० टक्के) असणार आहे.**

## मसुदा आयोगाकडे सादर केला जाणार




आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचे प्रारूप जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी दिली. प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी उपायुक्त मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सन २०१२ च्या जनगणनेनुसार कमीत कमी १८ हजार ३०० ते जास्तीत जास्त २२ हजार ४०० या दरम्यान प्रभागांची लोकसंख्या राहील. शहराच्या उत्तर भागापासून म्हणजे वडगाव गुप्ताच्या सीमारेषेपासून प्रभाग १ ची सुरुवात करण्यात आली आहे. झिकझॅक पद्धतीने अंतिम प्रभाग क्रमांक १७ ची सीमारेषा केडगाव उपनगरात दाखवण्यात आली आहे. एका प्रभागातून चार सदस्य असणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत या प्रारूपाची छाननी केली जाईल व त्यानंतर आराखडा नगरविकास विभागाकडे सादर केला जाईल. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडे तो सादर केला जाणार आहे. निवडणूक आयोगाने त्यांचे प्रतिनिधी म्हणून विभागीय आयुक्तांची नियुक्ती केली आहे. ३ पासून सप्टेंबरला प्रभाग रचनेचे प्रारूप प्रसिद्ध केले जाईल. त्यानंतर दि. ८ सप्टेंबरपर्यंत त्यावर हरकती मागवल्या जातील. ९ ते १८ सप्टेंबर दरम्यान त्यावर विभागीय आयुक्तांकडे सुनावणी होईल.राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार १ जुलै २०२५ पर्यंतची विधानसभा मतदारसंघ मतदारयादी निवडणुकीसाठी वापरली जाणार आहे. यापूर्वीच्या निवडणुकीसाठी २ लाख ५७ हजार मतदारसंख्या होती. ती आता वाढून ३ लाख ७ हजारपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

यापूर्वीच्या निवडणुकीसाठी ३३७ मतदान केंद्रे होती. सुधारित निकषानुसार एका मतदार केंद्रात ७०० ते ८०० मतदार असणार आहेत. त्यामुळे मतदान केंद्रांच्या संख्येत ६० ते ६५ ने वाढ होऊन ती एकूण ४१० होण्याची शक्यता आहे.प्रभाग रचना अंतिम झाल्यानंतर प्रभागांचे आरक्षण ठरले जाणार आहे. परंतु एकूण ६८ जागांपैकी ३४ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत. तसेच राज्य सरकारच्या आदेशानुसार २७ टक्के ओबीसी आरक्षण असणार आहे. त्यानुसार ६९ पैकी १८ जागा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी असतील. अनुसूचित जातीसाठी ९, अनुसूचित जमातीसाठी १ जागा राखीव असणार आहे. महिलांसाठी राखीव असलेल्या ३४ जागांपैकी अनुसूचित जातीच्या ५, अनुसूचित जमाती १, नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या ९ अशा १५ जागा विविध प्रवर्गांतील महिलांसाठी आरक्षित असणार आहेत; तर सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी १९ जागा राखीव असतील. एकूण ६८ पैकी २१ जागा खुल्या प्रवर्गासाठी उपलब्ध असतील, असे उपायुक्त मुंडे यांनी सांगितले. आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचे प्रारूप जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी दिली. प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी उपायुक्त मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सन २०१२ च्या जनगणनेनुसार कमीत कमी १८ हजार ३०० ते जास्तीत जास्त २२ हजार ४०० या दरम्यान प्रभागांची लोकसंख्या राहील. शहराच्या उत्तर भागापासून म्हणजे वडगाव गुप्ताच्या सीमारेषेपासून प्रभाग १ ची सुरुवात करण्यात आली आहे.

## २७ टक्के ओबीसी आरक्षण

झिकझॅक पद्धतीने अंतिम प्रभाग क्रमांक १७ ची सीमारेषा केडगाव उपनगरात दाखवण्यात आली आहे. एका प्रभागातून चार सदस्य असणार आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत या प्रारूपाची छाननी केली जाईल व त्यानंतर आराखडा नगरविकास विभागाकडे सादर केला जाईल. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडे तो सादर केला जाणार आहे.

# हर्णे बंदरात नारळी पौर्णिमेचा जल्लोष

## कोळीवाड्यांमध्ये नवचैतन्य ; पारंपारिक पद्धतीने नारळ दर्याला अर्पण

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“सन आयलाय गो, आयलाय गो, नारली पुनवेचा! मनी आनंद मावना कोळ्यांच्या दुनियेचा” या गाण्यांच्या तालावर हर्णे बंदरात नारळी पौर्णिमे निमित्त जल्लोषाचा माहोल रंगला. रत्नागिरी जिल्ह्यातील दोन नंबरचे बंदर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हर्णे, पाजपंढरी येथे पारंपरिक पधतीने कोळी बांधवांनी, विविध संघटनांच्या सहभागातून पारंपारिक मिरवणुका, सजवलेल्या होड्या आणि सोन्याचा नारळ अर्पण करण्याचा सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला.**



दोन महिन्यांच्या मासेमारी बंदीनंतर कोळीवाड्यांमध्ये नवचैतन्य आणणाऱ्या या सणासाठी हर्णे व पाजपंढरी येथील मिरवणुकीत होड्यांना देखण्या सजावटीने सजवण्यात आले. त्यातील मुख्य आकर्षण म्हणजे मोठा सोनेरी रंगाने मढवलेला नारळ, जो दर्यादिवतेस अर्पण करण्यात आला. रिक्षा संघटना, व्यापारी मित्र मंडळ, संपूर्ण कोळीवाडा संघटना, फत्तेगड ग्रामस्थ मंडळ यांसह अनेक संघटनांनी दणक्यात मिरवणुका काढल्या. पारंपरिक वाद्यांचा गजर, ढोल-ताशांच्या तालावर थिरकणारे पाय, आणि डीजेच्या आवाजाने बंदर परिसर दणाणून गेला.पारंपरिक वेशभूषा आणि सोन्याच्या दागिन्यांनी सजलेल्या कोळी महिला, तसेच आबालवृद्धांसह लहान मुलांचा उत्स्फूर्त सहभाग यावेळी पाहायला मिळाला. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री योगेश कदम, हर्णे ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य, दापोली तहसीलदार, प्रांताधिकारी, शासकीय अधिकारी, तसेच दापोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक महेश तोरस्कर व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम चोख पोलीस बंदोबस्तात शांततेत पार पडला.

## इतिहास आणि परंपरा

समुद्रकिनारी विधिवत पूजा करून सोन्याचा नारळ दर्यादिवतेस अर्पण करताना कोळी बांधवांच्या चेहऱ्यावर अपार उत्साह दिसत होता. गर्दीने फुललेल्या हर्णे जेटीवर “आमच्या बांधवांचे रक्षण कर” अशी साद दर्यादिवतेस घालण्यात आली. आगामी मासेमारी हंगाम समृद्ध होण्यासाठी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने मासेमारीला बंदी असते.

टॅरिफचा परिणाम

## टॅरिफच्या मुद्द्यावर अमेरिकन न्यायालयांना इशारा

# तर पुन्हा 1929 सारखी महामंदी येईल!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी इंटरनॅशनल एमर्जन्सी इक्नॉमिक पॉवर्स अ‍ॅक्ट (IEEPA) कमकुवत न करण्याचे आवाहन केले आहे. यावेळी त्यांनी अमेरिकन न्यायालयांना एक गंभीर इशारा देखील दिला आहे. IEEPA हा कायदा शीतयुद्धाच्या काळातील असून याचा वापर ट्रम्प यांनी भारतासह जगभरातील अनेक देशांवर शुल्क लादण्याचे समर्थन करण्यासाठी केला आहे. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर याबाबत एक पोस्ट लिहिली आहे, ज्यामध्ये त्यांनी त्यांच्या निर्णयामुळे देशाला प्रचंड आर्थिक फायदा होत असल्याचा दावा केला आहे.**

टॅरिफचा शेअर बाजारावर प्रचंड सकारात्मक परिणाम होत आहे. जवळपास प्रत्येक दिवशी नवीन विक्रम प्रस्थापित होत आहेत. याबरोबच देशाच्या तिजोरीत शेकडो अब्ज डॉलर्स येत आहेत, असे ट्रम्प त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.यावेळी ट्रम्प यांनी इशारा दिला की 'रॅडिकल लेफ्ट कोर्टाने' जर आयईईपीएच्या वापराच्या विरोधात निर्णय दिला तर याचा अर्थव्यवस्थेवर भयानक परिणाम होतील. इतकेच नाही तर १९२९ ची महामंदी पुन्हा एकदा येईल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. देशाच्या आर्थिक विकासाच्या गतीला धोका होऊ नये यासाठी असा निर्णय खूप आधीच या प्रकरणाच्या सुरूवातीलाच घ्यायला हवा होता, असेही ट्रम्प म्हणाले आहेत.अशा 'ज्युडिशीयल ट्रॅजडी'मधून अमेरिका सावरण्याची कसलीही शक्यता नाही, असेही ट्रम्प म्हणाले आहेत. मात्र यावेळी त्यांनी अमेरिकेच्या न्याय व्यवस्थेवर विश्वास व्यक्त केला आहे. देशाला यश आणि महानता मिळायला हवी, गोंधळाची स्थीती, अपयश आणि अपमान नाही,असेही ट्रम्प पोस्टच्या अखेरीस म्हणाले आहेत.IEEPA हा कायदा शीतयुद्धाच्या काळात लागू करण्यात आला होता. राष्ट्रीय आणीबाणी जाहीर झाल्यानंतर याच्या माध्यमातून जागतिक व्यापाराच्या नियंत्रणासाठी राष्ट्राध्यक्षांना व्यापक स्वरूपातील अधिकार मिळतात. ट्रम्प यांनी IEEPA या कायद्याचा उपयोग करत राष्ट्रीय सुरक्षेचा हवाला देऊन अनेकदा व्यापार निर्बंध लादले आहेत. सध्या IEEPA अंतर्गत राष्ट्राध्यक्षांना मिळणाऱ्या अधिकारांच्या व्याप्तीची कायदेशीर छाननी केली जात आहे, यादरम्यान ट्रम्प यांनी हे विधान केले आहे. अनेक कायेदेशीर तज्ज्ञांचे मत आहे, की या कायद्याचा वापर हा व्यापार धोरणात मूळ हेतूपेक्षा खूप जास्त केला जात आहे. याला न्यायलयात आव्हान देखील दिले जात आहे.त्यांचे म्हणणे आहे की हा कायदा दीर्घ काळासाठी 'ट्रेड टूल' म्हणून वापरासाठी तयार करण्यात आलेला नव्हता. याबरोबरच याचा वापर करून काँग्रेसच्या परवानगिशीवाय टॅरिफ लागू करणे हे संवैधानिक 'चेक्स अँड बॅलन्सेस'चे उल्लंघन ठरू शकते.ग्रेट डिप्रेशन म्हणजेच महामंदी ही अमेरिकन शेअर बाजार केसळण्यापासून १९२९ साली सुरू झाली होती. अधुनिक इतिहासातील सर्वात गंभीर आर्थिक संकटांपैकी हे एक होते. या काळात अनेक बँका कोशळल्या, मोठ्या प्रमाणात बेरोजगारी पसरली आणि औद्योगिक निर्मिती आणि जागतिक व्यापारात मोठी घसरण झाली होती. १९३३ पर्यंत अमेरिकेत जवळपास एक चतुर्थांश लोक हे बेरोजगार होते आणि ९००० हून अधिक बँका बंद पडल्या होत्या. टॅरिफचा शेअर बाजारावर प्रचंड सकारात्मक परिणाम होत आहे. जवळपास प्रत्येक दिवशी नवीन विक्रम प्रस्थापित होत आहेत. याबरोबच देशाच्या तिजोरीत शेकडो अब्ज डॉलर्स येत आहेत, असे ट्रम्प त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाले आहेत.यावेळी ट्रम्प यांनी इशारा दिला की 'रॅडिकल लेफ्ट कोर्टाने' जर आयईईपीएच्या वापराच्या विरोधात निर्णय दिला तर याचा अर्थव्यवस्थेवर भयानक परिणाम होतील. इतकेच नाही तर १९२९ ची महामंदी पुन्हा एकदा येईल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. देशाच्या आर्थिक विकासाच्या गतीला धोका होऊ नये

### ९००० हून अधिक बँका बंद पडल्या




### IEEPA काय आहे?

अमेरिका मका, सोयाबीन, सफरचंद, बदाम आणि इथेनॉल यासारख्या उत्पादनांवरील कर कमी करून तसेच अमेरिकेतील दुग्धजन्य उत्पादनांसाठी भारतात प्रवेश वाढवू इच्छिते. परंतु भारताने या मागण्यांना विरोध दर्शवला आहे.स्वामीनाथन यांच्या सन्मानार्थ एक नाणे आणि टपाल तिकिटाचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.

---

# एकता आणि मैत्रीचा नवा टप्पा

## SCO परिषदेसाठी चीन करणार पंतप्रधान नरेंद्र मोदींचं स्वागत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याच्या कारणावरून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादण्याची घोषणा केली. तसेच त्याआधी अमेरिकेने भारतावर २५ टक्के आयातशुल्क लावले होते. त्यामुळे अमेरिकेकडून लावण्यात येणारं एकूण आयातशुल्क ५० टक्क्यांवर पोहोचलं आहे. त्यामुळे याचा फटका भारताला बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



त्यामुळे अमेरिका-भारत संबंध ताणले गेले आहेत.अमेरिका सातत्याने भारतावर टीका करत असतानाच आता भारत आणि चीनमधील संबंध सुधारण्याची होण्याची शक्यता आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) च्या बैठकीसाठी चीनला जाणार आहेत. त्यामुळे भारत आणि चीनमधील संबंध सुधारण्याची शक्यता आहे.

३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या काळात तियानजिन येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आलेलं आहे. या बैठकीत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे देखील उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय बैठक होण्याची शक्यता आहे.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संभाव्य चीन दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आता चीनकडून अधिकृत प्रतिक्रिया समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शांघाय शिखर परिषदेच्या दौऱ्याचं चीन स्वागत करणार असल्याचं अधिकृत निवेदन चीनकडून जारी करण्यात आलं आहे. तसेच या निवदेनात चीनने एक महत्वाची प्रतिक्रिया देखील दिली आहे.

### चीनने निवदेनात काय म्हटलं?

पंतप्रधान नरेंद्र मोदी एससीओ शिखर परिषदेसाठी चीनला भेट देणार असल्याच्या वृत्तांनंतर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी म्हटलं की, "एससीओ तियानजिन शिखर परिषद ही एससीओच्या स्थापनेपासूनची सर्वात मोठी शिखर परिषद असेल. एससीओ तियानजिन शिखर परिषदेसाठी चीन पंतप्रधान मोदींचे चीनमध्ये स्वागत करत आहे.

# ‘ठरलं तर मग’ मालिका पुन्हा अव्वलस्थानी!

‘ठरलं तर मग’ मालिकेत अर्जुन-सायलीचं पुन्हा एकदा लग्न झालं असून, दोघंही सुभेदारांच्या घरात आपलं स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अर्जुन-प्रियाच्या लग्नात सायली अचानक एन्ट्री घेते आणि आपल्याच नवऱ्याशी पुन्हा एकदा लग्न करते. मात्र, या लग्नापासून सुभेदार आनंदी नसतात. ते सायलीला घरातून हाकलून लावतात, तिचा गृहप्रवेश करत नाहीत. पण, अर्जुन तिला घरात घेऊन येतो. आपल्या बायकोला पुन्हा एकदा मानाचं स्थान मिळवून द्यायचं असा निश्चय अर्जुनने केलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून ‘ठरलं तर मग’ मालिकेत नवनवीन ट्विस्ट आल्याचं पाहायला मिळालं. यामुळे प्रेक्षकांच्या मनात सुद्धा आता पुढे काय होणार याबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. याशिवाय आता ही मालिका अर्धा तास प्रसारित न करता रोज ८:१५ ते ९:०० अशी पाऊणतास प्रक्षेपित केली जाते. या सगळ्याचा सकारात्मक परिणाम मालिकेच्या टीआरपीवर झाला. ‘ठरलं तर मग’ मालिकेला पुन्हा एकदा रेकॉर्ड ब्रेकिंग टीआरपी मिळाला आहे. ‘ठरलं तर मग’ मालिका गेल्या काही आठवड्यांमध्ये टीआरपीच्या शर्यतीत दुसऱ्या स्थानी गेली होती. पण, मालिकेच्या टीमने भरपूर मेहनत घेऊन पुन्हा एकदा त्यांचं अव्वलस्थान पटकावलं आहे. ‘ठरलं तर मग’ मालिकेला गेल्या आठवड्यात ७ टीआरपी रेटिंग मिळालं आहे. सध्याच्या काळात टेलिव्हिजन मालिकेला ७ रेटिंग मिळणं ही मोठी गोष्ट आहे. त्यामुळे सर्व स्तरांतून ‘ठरलं तर मग’वर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# अंकिताने डीपीदादाला लिहिलं भावुक पत्र




गेल्यावर्षी ‘बिग बॉस मराठी’च्या घरात अंकिताने डीपीला राखी बांधली होती. अशातच आजच्या रक्षाबंधननिमित्तही अंकिताने डीपीसाठी खास भेटवस्तू पाठवली आहे. अंकिता सध्या भारतात नसल्याने यंदा ती डीपीला राखी बांधू शकत नाहीय; पण असं असलं तरी अंकिताने डीपीसाठी रक्षाबंधनचं खास गिफ्ट पाठवलं आहे. तसंच या गिफ्टबरोबर एक भावुक पत्रही पाठवलं आहे. याचा व्हिडीओ डीपीने त्याच्या युट्युब चॅनेलवर शेअर केला आहे. या व्हिडीओच्या सुरुवातीला डीपी अंकिताने दिलेलं गिफ्ट उघडतो, त्यात त्याच्यासाठी काही शर्ट असतात. यानंतर त्याला अंकिताने लिहिलेलं पत्र मिळतं. या पत्रातून तिने तिच्या डीपीदादांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# नम्रताने सांगितला ‘तो’ अनुभव

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं. आता ती वेगवेगळ्या चित्रपटात, नाटकात विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. नुकतीच नम्रता संभेरावने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये तिने ‘झी चित्र गौरव २०२५’चा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाल्यानंतरचा अनुभव लिहीला आहे. नम्रता संभेरावने पुरस्काराबरोबरचे काही फोटो शेअर करत लिहिलं आहे, “...आणि ते ‘झी चित्र गौरव’चं गाणं वाजलं माझ्यासाठी, सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री नम्रता संभेराव चित्रपट ‘नाच गं घुमा’ त्या क्षणी पोटात गोळा आला. आनंद, सुख, समाधान सगळं एकवटून आलं. हे लहानपणी टीव्हीवर बघितलं होतं, कोणाला पारितोषिक मिळालं की डोळ्यात पाणी यायचं. मग ते अनोळखी असलं तरी आणि तो दिवस माझ्या आयुष्यात आला.”पुढे नम्रताने लिहिलं की, भरत जाधव सरांनी नाव पुकारलं नमु, अंगावर सरसरून काटा आला. विनोदाचे महारथी भरत जाधव सरांकडून मला पुरस्कार मिळाला, खूपच भारी वाटलं. समोर विनोदाचे बाप बसले होते, अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे काय बोलावं साठवून ठेवावा असा क्षण. २० वर्ष झाली, सिने नाट्यसृष्टीत छोट्या मोठ्या भूमिका करत इथंवर पोहोचले. गर्दीतून हळूहळू अनेक अनुभवांसह शिकत स्वतःला पुढे ढकलत आज प्रमुख भूमिकेसाठी बक्षीस मिळवलं. प्रामाणिकपणे कलेवर प्रेम केलं, करत राहीन.“‘झी चित्र गौरव’च्या सर्व परीक्षकांचे मनापासून आभार. आशाच्या भूमिकेसाठी ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला ते म्हणजे परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी या दोन अत्यंत हुशार हरहुन्नरी व्यक्तींनी. तुमचे सुद्धा खूप खूप आभार. मुक्ता ताई माझं प्रेरणास्थान तुझेही आभार. ‘नाच गं घुमा’च्या सगळ्या समूहाचे, निर्मात्यांचे मनापासून आभार. या सगळ्यात तुमचाही मोठा वाटा आहे आणि प्रेक्षकांचे देखील मनापासून आभार,” असं नम्रता संभेरावने लिहिलं.दरम्यान, नम्रता संभेरावच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती लवकरच प्रदर्शित होणाऱ्या प्रसाद खांडेकर दिग्दर्शित ‘चिकी चिकी बुबूम बुम’ चित्रपटात झळकणार आहे. २८ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात तिचा कॅमिओ असणार आहे. याशिवाय दुसऱ्या बाजूला तिच्या ‘थेट तुमच्या घरातून’ नाटकाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या नाटकात नम्रतासह प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, शिवाली परब, प्रथमेश शिवलकर आणि भक्ती देसाई आहे. ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं.

# जिनिलीयाच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया

अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते. ते अनेकदा विनोदी रीलमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. आता हे जोडपे एका रीलच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या या रीलवर अनेक चाहत्यांनी अनेक कमेंट केल्या आहेत. रितेश देशमुख व जिनिलीया देशमुख यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. यावर लग्न म्हणजे काय? असे लिहिलेले दिसत आहे. जिनिलीया रितेशला म्हणते, “अहो लग्न म्हणजे काय हो?”, त्यावर रितेश म्हणतो, “अगं लग्न म्हणजे घोड्यावर बसून केलेला गाढवपणा”, या वाक्यानंतरच्या त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव लक्ष वेधून घेत आहेत. तो घाबरल्याचे दिसत आहे. तर जिनिलीया त्याच्याकडे डोळे मोठे करून बघत असल्याचे दिसत आहे. शेवटी ‘काय मी बोलून गेलो’हे गाणे ऐकायला मिळत आहे. रितेश-जिनिलीयच्या या व्हिडीओवर चाहत्यांनी मजेशीर कमेंट केल्याचे पाहायला मिळत आहे.रितेश-जिनिलीयाच्या या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्याने, “आता काही खरं नाही”, असे म्हणत हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. दुसऱ्या एका नेटकऱ्याने कमेंट करीत लिहिले, “आजचा दिवस जाउद्या वाहिनी”, आणखी एका नेटकऱ्याने म्हटले, “आता सुट्टी नाही”, असे म्हणत हसणाऱ्या इमोजी शेअर केल्या आहेत. अनेक नेटकऱ्यांनी आणखी काही मजेशीर कमेंट केल्या आहेत. “भाऊ आज उपाशी झोपणार”, “दादाचं काही खर नाही हो आता”,”रितेश भाऊ जेवायला मिळतंय ना”, “दादा आता जेवण विसरा”, “आज जेवण मिळणार नाही”, “खतम टाटा बाय बाय”, अशा भन्नाट कंमेट्स पाहायला मिळणार आहे.चाहत्यांसह काही कलाकारांनीदेखील यावर कमेंट केल्या आहेत. अभिनेत्री भाग्यश्रीने रितेश-जिनीलियाच्या व्हिडीओवर कमेंट करीत, “तुम्ही दोघे खूप क्यूट आहात”, असे म्हटले आहे. अभिनेत्रीने त्यांचे कौतुक केले आहे. तर सुयश टिळकने हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. याबरोबरच, प्रसिद्ध युट्यूबर अर्थव सुदामेनेदेखील हसण्याच्या इमोजी शेअर केले आहेत.दरम्यान, आता रितेश देशमुख व जिनिलिया कोणत्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते.



आयपीएल २०२६

## आर अश्विनने फ्रेंचायझीकडे रिलीजची विनंती केली

# सॅमसन राजस्थान सोडून चेन्नईत येणार?

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू व्हायला अजूनही सात ते आठ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. पण या स्पर्धेआधी होणाऱ्या लिलावाआधी ट्रेडिंग विंडो खुली आहे. त्यामुळे एका संघातील खेळाडू दुसऱ्या संघात आणि दुसऱ्या संघातील खेळाडू आपल्या संघात घेण्याचा पर्याय फ्रेंचायझींसमोर उपलब्ध आहे. आगामी आयपीएल २०२६ स्पर्धेआधी सर्वात चर्चेत राहिलेला खेळाडू म्हणजे राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन. त्याने राजस्थान रॉयल्सला पत्र लिहून, मला रिलीज करण्यात यावं अशी विनंती केली आहे. संजूने राजस्थान रॉयल्सची साथ सोडल्यानंतर तो आगामी हंगामात चेन्नई सुपर किंग्जकडून खेळण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान संजू या संघात येण्याआधीच चेन्नईच्या स्टार खेळाडूने चेन्नई सुपर किंग्ज संघाची साथ सोडण्याची तयारी केली आहे.**

### जस्थान रॉयल्स संघ काय निर्णय घेणार




भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करणारा आर अश्विन गेल्या हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळताना दिसून आला होता. त्याला गेल्या हंगामात १४ पैकी ९ सामने खेळण्याची संधी मिळाली होती. क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, आर अश्विन चेन्नई सुपर किंग्ज संघाची साथ सोडणार आहे. याबाबत त्याने फ्रेंचायझीला कळवल्याचंही म्हटलं जात आहे. मात्र अश्विन या संघाची साथ का सोडत आहे, याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. चेन्नई सुपर किंग्ज संघ आर अश्विनला दुसऱ्या संघासोबत ट्रेड करणार की त्याला लिलावात पाठवणार हे देखील स्पष्ट झालेलं नाही.आर अश्विनने याच वर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला होता. तो केवळ फ्रेंचायझी क्रिकेट खेळताना दिसून येत होता. काही दिवसांपूर्वी तो तामिळनाडू प्रीमियर लीग स्पर्धा खेळताना दिसून आला होता. गेल्या आयपीएल हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळताना त्याने ९ सामन्यांमध्ये ७ गडी बाद केले होते.

या हंगामात अश्विनला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती. आयपीएल २०२५ स्पर्धेसाठी झालेल्या लिलावात चेन्नई सुपर किंग्जने त्याला ९.७५ कोटींची बोली लावून आपल्या संघात स्थान दिलं होतं.संजू सॅमसन गेल्या काही वर्षांपासून राजस्थान रॉयल्स संघाचा भाग आहे. त्याला या संघाचं नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. मात्र आगामी हंगामापूर्वी त्याने या संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. राजस्थान रॉयल्सचे संघमालक आणि राहुल द्रविड याबाबत निर्णय घेणार असल्याचं म्हटलं जात आहे. संजू सॅमसन हा राजस्थान रॉयल्स संघाचा सर्वात यशस्वी कर्णधार आहे. त्याने राजस्थान रॉयल्स संघासाठी फलंदाजी करताना सर्वाधिक ३९३४ धावा केल्या आहेत. आता चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स संघ काय निर्णय घेणार, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू व्हायला अजूनही सात ते आठ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे.पण या स्पर्धेआधी होणाऱ्या लिलावाआधी ट्रेडिंग विंडो खुली आहे. त्यामुळे एका संघातील खेळाडू दुसऱ्या संघात आणि दुसऱ्या संघातील खेळाडू आपल्या संघात घेण्याचा पर्याय फ्रेंचायझींसमोर उपलब्ध आहे. आगामी आयपीएल २०२६ स्पर्धेआधी सर्वात चर्चेत राहिलेला खेळाडू म्हणजे राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन. त्याने राजस्थान रॉयल्सला पत्र लिहून, मला रिलीज करण्यात यावं अशी विनंती केली आहे. संजूने राजस्थान रॉयल्सची साथ सोडल्यानंतर तो आगामी हंगामात चेन्नई सुपर किंग्जकडून खेळण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान संजू या संघात येण्याआधीच चेन्नईच्या स्टार खेळाडूने चेन्नई सुपर किंग्ज संघाची साथ सोडण्याची तयारी केली आहे. भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करणारा आर अश्विन गेल्या हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळताना दिसून आला होता. त्याला गेल्या हंगामात १४ पैकी ९ सामने खेळण्याची संधी मिळाली होती.

### कुठलीही अधिकृत माहिती समोर नाही

क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, आर अश्विन चेन्नई सुपर किंग्ज संघाची साथ सोडणार आहे. याबाबत त्याने फ्रेंचायझीला कळवल्याचंही म्हटलं जात आहे. मात्र अश्विन या संघाची साथ का सोडत आहे, याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. चेन्नई सुपर किंग्ज संघ आर अश्विनला दुसऱ्या संघासोबत ट्रेड करणार की त्याला लिलावात पाठवणार हे देखील स्पष्ट झालेलं नाही.

# संधी न मिळालेला अभिमन्यू झाला भावूक

## अभिमन्यूला कसोटी संघासाठी पदार्पण करता आलेलं नाही

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका पार पडली. शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने या मालिकेत दमदार कामगिरी केली. ही मालिका २-२ ने बरोबरीत समाप्त झाली. ही मालिका भारतीय संघाच्या हातून जवळजवळ निसटली होती. पण मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णाने ओव्हल कसोटीत विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली.**




त्यामुळे ही मालिका बरोबरीत समाप्त झाली. या मालिकेसाठी प्रामुख्याने युवा खेळाडूंना भारतीय संघात स्थान देण्यात आलं होतं. ज्यात अभिमन्यू ईश्वरनचा देखील समावेश होता. पण त्याला ५ पैकी एकाही सामन्यात संधी दिली गेली नाही.अभिमन्यू ईश्वरनचा इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला. त्याला भारतीय संघात स्थान मिळण्याची ही पहिलीच वेळ नव्हती. याआधीही २०२१ ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी त्याला भारतीय संघात स्थान देण्यात आलं होतं. मात्र, ४ वर्षे उलटूनही त्याला पदार्पण करण्याची संधी मिळालेली नाही. गेल्या ४ वर्षात १५ खेळाडूंना भारतीय कसोटी संघासाठी पदार्पण करण्याची संधी मिळाली आहे. पण अभिमन्यू ईश्वरनचा नंबर अजूनही लागलेला नाही. देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करून त्याने बऱ्याचदा भारतीय संघात स्थान मिळवलं आहे. पण त्याला कसोटी संघासाठी पदार्पण करता आलेलं नाही.विक्की लालवानीच्या युट्यूब चॅनेलवर बोलताना अभिमन्यू ईश्वरनचे वडील रंगनाथन म्हणाले, “त्याला संधी न मिळाल्याने तो नाराज होता. मी त्याला कॉल केला, त्यावेळी तो मला म्हणाला, पप्पा मला अजूनही संघात स्थान मिळालेलं नाही.

### निवड न झाल्याने स्वप्न तुटणार नाही

मी आता दुलीप ट्रॉफी स्पर्धेसाठी बंगळुरूला जाणार आहे. तिथे तो १० ते १२ दिवस राहणार. त्यानंतर डेहराडूनला परतणार. तो चिंताग्रस्त असल्याचं स्पष्टपणे जाणवत होतं. तरी तो म्हणाला, मी २३ वर्षांपासून हे स्वप्न जगतोय. एक- दोन सामन्यात निवड न झाल्याने हे स्वप्न तुटणार नाही.”गौतम गंभीर सध्या भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक आहे. अभिमन्यूच्या वडिलांनी गौतम गंभीरचा देखील उल्लेख केला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार ।

। दि. 9 ऑगस्ट 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

## आंतरराष्ट्रीय परिषद ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या

# "एआय"च्या माध्यमातून संशोधनाला पाठबळ!

### शिक्षण विश्व: शाश्वत विकास नवोपक्रम, प्रभाव आणि समावेश" विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या माध्यमातून नवनवीन संशोधनामध्ये आणखी परिणामकारकरीत्या संशोधन करण्यासाठी प्रेरक पाठबळ मिळेल असे मत आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये व्यक्त करण्यात आले.**



"शाश्वत विकास: नवोपक्रम, प्रभाव आणि समावेश" या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद १ व २ ऑगस्ट २०२५ रोजी ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या पार पडली.

ही परिषद एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी (देवाची), पुणे, अवंतिका विद्यापीठ, उज्जैन, आणि वेदांत नॉलेज सिस्टीम्स प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेमध्ये जगभरातील १०० प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. यामध्ये विविध क्षेत्रातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परिषदेमध्ये ६६ संशोधन प्रबंध सादर करण्यात आले, जे परिषदेच्या मुख्य विषयाशी सुसंगत होते. या परिषदेचा एक प्रमुख आकर्षणाचा भाग म्हणजे "AI IN RESEARCH" (संशोधनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता) या विषयावर १ ऑगस्ट २०२५ रोजी घेण्यात आलेली कार्यशाळा होती. या कार्यशाळेमध्ये २५० पेक्षा अधिक सहभागी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

परिषदेचे उद्घाटन डॉ. अनंत चक्रदेव, ग्रुप प्रोव्होस्ट, एमआयटी पुणे यांच्या हस्ते झाले. डॉ. नितीन राणे, कुलगुरू, अवंतिका विद्यापीठ यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. बी. बी. वाफारे, संचालक, एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी (देवाची), पुणे, यांनी प्रास्ताविक सादर केले. प्रमुख व्याख्यान डॉ. जयंत सोनवलकर, माजी कुलगुरू, एमपी भोज ओपन युनिव्हर्सिटी, यांनी सादर केले.

समारोप सत्राचे मुख्य पाहुणे म्हणून डॉ. संजीव चोप्रा, माजी आयएएस अधिकारी, इतिहासकार व स्तंभलेखक, यांनी मार्गदर्शन केले. या परिषदेचे संयोजन डॉ. अमोल माने, उपसंचालक प्रा. अक्षदा कुलकर्णी, डॉ. मानसी अतितकर, एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी (देवाची), पुणे, तसेच डॉ. हरीश बापट, डॉ. मासुमा मेहता आणि डॉ. अंकुर कुमार रस्तोगी (अवंतिका विद्यापीठ, उज्जैन) आणि आयोजन समिती सदस्य यांनी केले. ही परिषद शैक्षणिक सहकार्य, संशोधन प्रसार आणि अधिक शाश्वत आणि समावेशक भविष्य घडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय संवादासाठी एक व्यासपीठ म्हणून अत्यंत फलदायी ठरली.

# निगडी-चिंचवड रस्ता मृत्यूचा सापळा!

### महामेट्रोच्या हलगर्जी कारभारावर माजी नगरसेवक विजय शिंदे यांचा हल्लाबोल

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील नागरिकांना आधुनिक सुविधांसाठी सुरू असलेली महामेट्रोची कामे सध्या जीवघेणी ठरत आहेत. विशेषतः निगडी ते चिंचवड मार्गावरील रस्त्यांची झालेली दुरवस्था, खड्डे, धूळधक्कड आणि वाहतूक कोंडीमुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक विजय शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेत महामेट्रो आणि महापालिका प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनावर थेट हल्लाबोल केला आहे.**




शिंदे यांनी मेट्रो व महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह चिंचवड स्टेशन ते निगडी आणि आकुर्डी परिसरातील रस्त्यांची पाहणी केली. यावेळी रस्त्यांची झालेली चाळण, खड्ड्यांचे साम्राज्य आणि नागरिकांच्या सुरक्षेचा अभाव पाहून त्यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली. "मेट्रोच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. या प्रकाराला आळा घालण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे," असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

रस्त्याची दुरवस्था, अपघातांची वाढ

महामेट्रोच्या कामांमुळे रस्त्यावर मोठे खड्डे तयार झाले असून, वेळेवर दुरुस्ती न केल्याने दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे प्राणघातक ठरत आहेत. अनेक नागरिक जखमी झाले असून, वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. रुग्णालये, शाळा, आणि औद्योगिक भागाशी जोडणारा हा मुख्य रस्ता असल्याने रोज हजारो वाहनांची वाहतूक होते. या सगळ्यामुळे नागरिकांना शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

वाहतूक कोंडीचा अडथळा

मेट्रोच्या कामांमुळे रस्त्याचा बहुतांश भाग अडवण्यात आला असून, उर्वरित अरुंद रस्त्यावरूनच वाहतूक चालते. यामुळे विशेषतः कार्यालयीन वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, नागरिक वेळेवर पोहोचू शकत नाहीत. पालखी सोहळ्याच्या दरम्यान देखील पावसामुळे चिखल व पाणी साचल्याने वारकऱ्यांची गैरसोय झाली.

तीव्र आंदोलनाचा इशारा

माजी नगरसेवक शिंदे यांनी प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचा इशारा दिला आहे. "ताबडतोब सर्व खड्डे बुजवा, कामाच्या ठिकाणी जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती फलकावर लावा, अन्यथा पुढील अपघातांना मेट्रो प्रशासनच जबाबदार असेल," असा इशारा देत त्यांनी तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

अधिकाऱ्यांची उपस्थिती

या पाहणी दौऱ्यात महापालिकेचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता अभिमान भोसले, विपिन थोरमोडे, तर महामेट्रोचे प्रकल्प अधिकारी वाय. बी. सिंग, धनंजय योगानंद, श्री. कुलकर्णी, श्री. उपेंद्र सिंग, श्री. मिश्रा आदि उपस्थित होते.

निष्काळजीपणावर कठोर शब्दांत टीका

शिंदे म्हणाले, "विकासकामांना आमचा विरोध नाही, परंतु नागरिकांच्या जिवाशी खेळणारा निष्काळजी कारभार खपवून घेतला जाणार नाही. वेळेवर उपाययोजना न झाल्यास आम्ही नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडू." महामेट्रोच्या कामामुळे नागरिकांचे जीवन संकटात सापडले असून, प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत, तर याचे तीव्र परिणाम भोगावे लागतील, असा स्पष्ट इशारा शिंदे यांनी दिला आहे.

# प्रशासनाने नागरिकांच्या समस्यांचे देखरेख व पाठपुरावा करावे

## आमदार शंकर जगताप : 'आमदार आपल्या दारी' उपक्रमात 753 तक्रारींचे निराकरण

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका प्रशासनाने देखील नागरिकांच्या समस्या समजून घेत त्या प्रभावीपणे देखरेखीखाली ठेवून त्यावर सातत्याने पाठपुरावा करावा, प्रशासन व पदाधिकाऱ्यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास शहरातील प्रश्न सोडवणे सुलभ होईल, असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले. 'आमदार आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन नवी सांगवी येथे गुरुवार (दि. ७ ऑगस्ट) रोजी सकाळी करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.**



आमदार जगताप म्हणाले की, "महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्य, वाहतूक, ड्रेनेज अशा समस्यांचे गांभीर्याने देखरेख करावी आणि त्यावर वेळोवेळी पाठपुरावा करत अडचणींचा ठोस उपाय शोधावा. आमदार म्हणून आम्ही आमच्या पातळीवर हा पाठपुरावा करत असतो. मात्र प्रशासन आणि पदाधिकारी एकत्रितपणे कार्यरत राहिल्यास समस्या अधिक तत्परतेने सुटू शकतात." वाहतूक विभागाबाबत बोलताना त्यांनी नमूद केले की, "वाहतूक पोलिसांनी नागरिकांना लहान चुका दाखवून शिस्त लावल्यास भविष्यातील अपघात किंवा अडथळे टाळता येतील."

**नागरिकांनी मांडलेल्या विविध ७५३ तक्रारींचे तात्काळ निराकरण**

'आमदार आपल्या दारी' या उपक्रमादरम्यान नागरिकांनी आरोग्य, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वाहतूक, शासकीय दाखले, रेशन कार्ड, वीजपुरवठा यांसारख्या विविध विभागांशी संबंधित एकूण ७५३ तक्रारी मांडल्या होत्या. या तक्रारींचे स्थानिक प्रशासन व विभागीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तात्काळ निराकरण करण्यात आले, ही या उपक्रमाची विशेष बाब ठरली.

या कार्यक्रमाला माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, माजी नगरसेविका शारदा सोनवणे, उषा मुंडे, माधवी राजापुरे, तसेच महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या अधिकारी वैशाली सागाडे, वाहतूक विभागाचे पीएसआय राजाराम काकडे, सांगवी पोलिस ठाण्याचे पीएसआय ढगे, स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता सुधीर वाघमारे, जलनिस्सरण विभागाचे कार्यकारी अभियंता विजय ओव्हाळ, अ प्रभागाचे आरोग्य अधिकारी शिंदे, तहसीलदार जयराज देशमुख, रेशनिंग विभागाचे क्षीरसागर, विद्युत विभागाचे गवारी, पंचरसोत्तम समाज कल्याण विभागाचे प्रकल्प अधिकारी सतीश बंडगर हे उपस्थित होते.

# शहरात आयुर्वेद आणि होमिओपॅथी ओपीडी सुरू करण्यासाठी पाठपुरावा

## आमदार अमित गोरखे यांचे निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**

पिंपरी-चिंचवड: आमदार अमित गोरखे यांच्या पाठपुराव्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना आता महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये पुन्हा एकदा आयुर्वेद आणि होमिओपॅथी उपचार मिळणार आहेत.

महापालिका प्रशासनाने शहरातील तीन रुग्णालयांमध्ये या ओपीडी (OPD) तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी वायसीएम रुग्णालयातील आयुर्वेदिक ओपीडी बंद झाल्याने नागरिकांची गैरसोय होत होती. आमदार गोरखे यांनी विधानपरिषदेमध्ये लक्ष वेधले होते, आयुक्तांनी देखील या संदर्भात प्रामुख्याने लक्ष घातले होते.

या मागणीनंतर झालेल्या बैठकीत आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. यामुळे नागरिकांना आता स्वस्त आणि सोप्या पद्धतीने उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याशिवाय, श्वान हल्ले आणि पशुवैद्यकीय विभागातील भ्रष्टाचारावर तातडीने उपाययोजना करणे, तसेच सांस्कृतिक कार्यक्रम अचानक रद्द होण्यावर आळा घालण्यासाठी धोरण ठरवणे यासारख्या मागण्याही त्यांनी केल्या. या सर्व विषयांवर आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे आदेश दिल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये शहराला मिळालेल्या यशाबद्दल त्यांनी आयुक्त व महापालिका कर्मचाऱ्यांचे अभिनंदनही केले.



DYP
DR. D. Y. PATIL EDUCATIONAL COMPLEX, AKURDI, PUNE

# Dr D Y Patil Educational Complex, Akurdi, Pune

*Approved by AICTE, DTE, MSBTE & Govt. of Maharashtra,*
*Accredited by NBA & Grade Status by NAAC, Affiliated to Savitribai Phule Pune University*

**ADMISSIONS OPEN 2025-26**

41 YEARS Academic Excellence

## Experience D Y Patil Educational Complex



- **15k+** Students Placed
- **52 LPA** Highest Package
- **50,000+** Alumni
- **1000+** Empanelled Recruiters
- **150+** University Toppers

## Our Institutes

### D Y Patil College of Engineering (Autonomous)
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Accredited by NAAC with 'A' Grade & NBA
*UG – Comp / Mech / IT / E&TC / AIDS / Civil / Instrumentation & Control / R&A*
*PG – Comp / E&TC (VLSI/ES) / Civil (C&M/Env) / Mech (Design) / R&A*
*PhD – Mech / E&TC / Civil*

### D Y Patil Institute of MCA & Management
Accredited by NAAC with 'A' Grade & Affiliated to SPPU
*MCA / MBA / PhD (Management)*

### Dr D Y Patil College of Architecture
Accredited by NAAC with 'A' Grade & Approved by COA
*B Arch / M Arch (Construction Management) / D Arch*

### D Y Patil PGDM Institute, Akurdi, Pune
***NRI Quota Open: AY 2025 – 26***
Approved by A.I.C.T.E., New Delhi & Recognized by Govt. of Maharashtra
*Specializations: Marketing / Human Resource / Finance / Logistics & Supply Chain / Business Analytics / Innovation & Entrepreneurship / Agri Business / Pharma & Healthcare Management*

### Dr D Y Patil College of Agriculture Business Management
Affiliated to Krishi Vidyapeeth, Rahuri & Recognized by MCAER, Pune
*BSc (Hons) Agri Business Management*

### Dr D Y Patil College of Pharmacy
Affiliated to SPPU & Approved by PCI New Delhi
Accredited by NBA & NAAC with 'A+' GRADE
*D Pharm / B Pharm / Pharm D / M Pharm (Phcol) / M Pharm (Pharmaceutics) / M Pharm (DRA) / M Pharm (PQA) / M Pharm (Pchem) / M Pharm (PP) / PhD*

### Dr D Y Patil Institute of Pharmacy
Affiliated to MSBTE, Mumbai & Approved by PCI New Delhi
*D Pharm*

### Y B Patil Polytechnic
Approved by AICTE, Affiliated to MSBTE & Recognized by D.T.E. Maharashtra
*Diploma in Civil / Mech / Comp / E&C (Accredited by NBA)*

## Campus at a Glance

- Beautifully landscaped lush green campus
- Virtual Lab Nodal Centre of IIT Bombay
- Digital Classrooms & Libraries
- Online Teaching Learning Platforms
- Highly Qualified & Experienced Faculty
- Outstanding academic results
- Collaboration with International Universities
- Wi-Fi enabled campus / ERP Enabled Administration
- Extravagant Cafeterias & Sports Complex
- Ultra-modern Auditoriums, Seminar Halls
- Conducive & disciplined environment
- Incubation & Startup ecosystem
- State-of-the-Art Hostel for Girls & Boys

## Corporate Relations & Placement Cell

- Strong Alumni engagement
- Internship Opportunities in Industry
- Industry-Centric Training Programs
- International Placement Opportunities
- Notable Placement Record
- Employability Assessment Test conducted by SHL for students (First year to Final Year)
- Corporate Tie-ups & Partnerships with industry for student enrichment activities
- Participation of students in Hackathons & competitions organized by Industries
- Thrust on Personality Development, Soft Skills & Communication Skills in English in Language Laboratories

## Collaborations with Industry (MOU's & COE's)

JENDAMARK | wipro | NTT DATA | virtusa | B&R | Emcure | KNORR-BREMSE | NuLife | Evolving X | CitiusTech | SHL | McKinley Rice | bvc | Technouniq | RPG | CONSTROLOGIX | NASSCOM FOUNDATION | INDOVANCE | Tech Mahindra | DataTech Labs | EMERSON | newgen

SECTOR NO. 29, NIGDI PRADHIKARAN, AKURDI, PUNE 411044, MAHARASHTRA, INDIA
www.dypakurdipune.edu.in admission@dypakurdipune.edu.in @dypakurdipune
9373775038 / 9607957618 / 9075345011 / 9158195999

REGISTER HERE

DESIGNED BY SHIVPRASAD S PATIL

**"Discover, Learn, Lead—The D Y Patil Way."**